18-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/17/2025 11:04 PM Page 1



## निवडक

### इंग्लंड दौऱ्यासाठी के.एल. राहुलच्या स्थानावर चर्चा

**नवी दिल्ली, दि.१७ :** भारताचे माजी फलंदाज आणि प्रशिक्षक डब्ल्यू.व्ही. रमन यांनी आगामी इंग्लंड कसोटी मालिकेच्या पार्श्वभूमीवर टीम इंडियाच्या फलंदाजीबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. विशेषतः के.एल. राहुलच्या संभाव्य स्थानाबाबत त्यांनी सखोल विश्लेषण केले. अनुभवी फलंदाज के.एल. राहुल याच्या क्रमवारीतील भूमिकेवर आणि युवा खेळाडू बी. साई सुदर्शन याला मिळणाऱ्या संधींवर रमन यांनी स्पष्ट मत मांडले.

रोहित शर्माच्या कसोटी निवृत्तीनंतर राहुल सलामीवीर म्हणून खेळणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. नॉथम्प्टनमध्ये इंग्लंड लायन्सविरुद्ध इंडिया 'अ' संघासाठी राहुलने ११६ आणि ५१ धावांची सशक्त खेळी साकारली होती, त्यामुळे त्याची फॉर्मही चांगली आहे.

रमन म्हणाले, राहुल हा संघातील सर्वात अनुभवी फलंदाज आहे. त्याच्यात संयम आणि स्वभाव आहे, तसेच त्याने तीनही प्रकारात भारतासाठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे त्याच्याकडून खूप अपेक्षा असतील. त्याला फलंदाजीच्या कोणत्याही स्थानावर तग धरता येतो, आणि हेच त्याचे खरे सामर्थ्य आहे.

ते पुढे म्हणाले, संघ व्यवस्थापनाने राहुलच्या स्थानाबाबत स्पष्ट योजना आखायला हवी. ही पाच कसोटींची मालिका आहे, त्यामुळे सुरुवातीला प्रयोग करण्याची संधी असते, पण उत्तरार्धात स्थिर संयोजन आवश्यक ठरेल. साई सुदर्शनबाबत मत व्यक्त करताना रमन म्हणाले की, साई सुदर्शनमध्ये इंग्लंडमधील परिस्थितीबाबत अनुभव आहे. तो जलद शिकणारा आणि स्थिर स्वभावाचा खेळाडू आहे. तरीही, मला खात्री नाही की तो पहिल्या दोन कसोटींमध्ये खेळेल. प्लेइंग इलेव्हनमध्ये त्याचा समावेश होईल की नाही हे संघ व्यवस्थापनावर अवलंबून आहे.

दुसरीकडे, इंग्लंडच्या गोलंदाजी आक्रमणात प्रमुख वेगवान गोलंदाज अनुपस्थित असले तरी, रमन यांनी भारतीय फलंदाजांना सावध राहण्याचा सल्ला दिला. जोफ्रा आर्चर, मार्क वूड आणि गस अॅटकिन्सन या प्रमुख गोलंदाजांच्या अनुपस्थितीत इंग्लंडचा हल्ला थोडा कमजोर वाटतो, पण ख्रिस वोक्स, जेमी ओव्हरटन आणि ब्रायडन कार्ससारखे गोलंदाज परिस्थितीचा फायदा घेऊ शकतात. भारतीय फलंदाजी मजबूत वाटते, पण कठीण परिस्थितीत तिची खरी कसोटी लागेल.

रमन यांनी बेन स्टोक्सच्या योगदानाचीही आठवण करून दिली. बेन स्टोक्स हा एक असा कर्णधार आहे जो योग्य वेळी सामन्याचे चित्र बदलू शकतो.

# पहिल्या सामन्यात जसप्रीत बुमराहला विश्रांती?




**मुंबई, दि. १७ :**

इंग्लंडविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेत भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह कसा वापरला जाईल, यावर सध्या क्रिकेट वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी याआधी स्पष्ट केले होते की बुमराह सर्व कसोट्या खेळणार नाही. त्याच्या कार्यभाराचे व्यवस्थापन हे संघ व्यवस्थापनासाठी एक महत्त्वाचे आव्हान असणार आहे.

ऑस्ट्रेलियाचा माजी फिरकीपटू ब्रॅड हॉग यांनीही या पार्श्वभूमीवर बुमराहबाबत एक रोचक सल्ला दिला आहे. हॉग यांच्या मते, भारताने २० जूनपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीत बुमराहला विश्रांती द्यावी आणि त्याचा पुढील दोन कसोट्यांत धोरणात्मक वापर करावा.

भारताला या मालिकेकडे पूर्णपणे रणनीतीच्या दृष्टीने पाहावे लागेल. बुमराह जिथे सामन्याचे पारडे झुकवू शकतो, तिथेच त्याचा वापर करणे योग्य ठरेल, असे हॉग यांनी रेव्हस्पोर्ट्झ' या माध्यमाशी बोलताना सांगितले. उदाहरणार्थ, लॉर्ड्स आणि वॉरविकशायरसारख्या मैदानांवर तो निर्णायक ठरू शकतो. पहिल्या कसोटीत त्याला न खेळवण्याचा निर्णय इंग्लंडसाठी गोंधळ उडवणारा ठरू शकतो. जर तो दुसऱ्या सामन्यात मैदानात उतरला आणि परिस्थिती बदलली, तर इंग्लंड संघावर अचानक दबाव येईल असे हॉग यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या मालिकेद्वारे भारताच्या कसोटी नेतृत्वात नव्या युगाची सुरुवात होत आहे. रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर सलामीवीर शुभमन गिल याच्याकडे कसोटी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. गिल भारताचा ३७ वा कसोटी कर्णधार ठरला आहे. आगामी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ चक्रातील ही पहिली मालिका असेल.

गिलने माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समिती प्रमुख अजित आगरकर यांनी त्याच्यावर कोणतेही दडपण टाकलेले नाही. ते दोघं मला सतत स्वतःच्या शैलीत नेतृत्व करण्याचा सल्ला देतात. मी जे करू शकत नाही ते करण्याचा अट्टाहास ठेवू नये, हे ते स्पष्टपणे सांगतात, असे गिल म्हणाला.

या मालिकेत गिलला यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत उपकर्णधार म्हणून साथ देणार आहे. गिलने आतापर्यंत सलामीवीर तसेच क्रमांक तीनवर भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळले आहे. आता कर्णधार म्हणून त्याची क्षमता कसोटीत पहिल्यांदाच पारखली जाणार आहे.

# इंग्लंड दौऱ्यासाठी हर्षित राणाची भर ?

**नवी दिल्ली, दि. १७ :**




इंग्लंडविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेसाठी भारताचा संघ १८ वरून १९ सदस्यांचा होण्याची शक्यता आहे. दैनिक जागरणच्या वृत्तानुसार, वेगवान गोलंदाज हर्षित राणा याचा संघात समावेश करण्यात आला असून, बीसीसीआयकडून मात्र याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

इंग्लंड दौऱ्याची सुरुवात लीड्स येथील हेडिंग्ले मैदानावर २० जूनपासून होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याने होणार आहे. त्यापूर्वीच नव्या प्रशिक्षक गौतम गंभीर याच्या मार्गदर्शनाखालील संघ अधिक सशक्त करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसत आहे.

२४ मे रोजी जाहीर झालेल्या मूळ १८ सदस्यांच्या संघात साई सुदर्शन याला पहिल्यांदाच कसोटी संघात स्थान देण्यात आले होते, तर करुण नायर आणि शार्दुल ठाकूर यांनी पुनरागमन केले. या संघात जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप आणि अर्शदीप सिंग या पाच वेगवान गोलंदाजांचा समावेश करण्यात आला होता. आता हर्षित राणाचा समावेश झाल्यास तो संघातील सहावा वेगवान गोलंदाज ठरेल.

हर्षित राणा सध्या इंग्लंडमध्ये भारत अ' संघासोबत आहे. त्याने नुकतेच इंग्लंड लायन्सविरुद्ध कॅन्टरबरी येथे खेळले, जिथे त्याने १६ धावा करताना ९९ धावांत एक गडी बाद केला. भारतीय संघात निवड न झाल्यामुळे त्याच्या पुनरागमनाची शक्यता गृहीत धरली जात आहे, विशेषतः मुख्य संघातील काही खेळाडू अजूनही काउंटी क्रिकेटसाठी करारबद्ध नाहीत.

राणाने गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत पदार्पण केले होते. त्या दौऱ्यात त्याला चार विकेट्स मिळाल्या होत्या. पर्थ कसोटीत त्याने ३/४८ अशी सर्वोत्तम कामगिरी केली होती. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये राणाने १३ सामन्यांत ४८ बळी घेतले असून, त्याची गोलंदाजी सरासरी २७.७९ आहे. फलंदाज म्हणूनही त्याने ३२.८० च्या सरासरीने धावा करताना एक शतक व दोन अर्धशतके नोंदवली आहेत.

दरम्यान, भारताचा हा इंग्लंड दौरा २०२५-२७ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप सायकलमधील पहिली मालिका आहे. शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील संघ २००७ नंतर पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकण्याच्या तयारीत आहे. लीड्स (हेडिंग्ले), बर्मिंगहॅम (एजबॅस्टन), लंडन (लॉर्ड्स आणि द ओव्हल) आणि मँचेस्टर (ओल्ड ट्रॅफर्ड) येथे पाच कसोटी सामने खेळवले जाणार आहेत.

# दिल्ली डेअरडेव्हिल्समध्ये अनेक 'विषारी पात्रे' होती

**▸ एबी डिव्हिलियर्सचा गौप्यस्फोट**

**मुंबई, दि. १७ :**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा प्रमुख चेहरा ठरलेला आणि जगभरात मिस्टर ३६०' म्हणून ओळखला जाणारा एबी डिव्हिलियर्सने आपल्या आयपीएलच्या सुरुवातीच्या कारकिर्दीबाबत एक मोठा खुलासा केला आहे. २००८ मध्ये दिल्ली डेअरडेव्हिल्स (सध्याचे दिल्ली कॅपिटल्स) संघाकडून आयपीएलमध्ये पदार्पण करणाऱ्या डिव्हिलियर्सने सांगितले की, त्या संघातील विषारी वातावरण' त्याच्या कामगिरीत अडथळा ठरत होते.

क्रिकेट डॉट कॉमला दिलेल्या मुलाखतीत डिव्हिलियर्स म्हणाला, दिल्ली डेअरडेव्हिल्सच्या त्या संघात अनेक विषारी पात्रे होती. मला त्यांची नावे घ्यायची नाहीत, पण वातावरण हे संघासाठी योग्य नव्हते. लोकांमध्ये जळजळ होती, आणि त्याचा परिणाम खेळावर होत होता.




डिव्हिलियर्सने जरी त्या काळात फारशी चमकदार कामगिरी केली नाही, तरी त्याला संघात काही दिग्गजांसोबत खेळण्याचा बहुमोल अनुभव मिळाला, हे त्याने मान्य केले. माझ्यासाठी कडू-गोड क्षण होते. मी त्या आठवणींना प्रेमाने आठवतो कारण मला ग्लेन मॅकग्रा आणि डॅनियल व्हेटोरीसोबत वेळ घालवायची संधी मिळाली. हे दोघे माझे आदर्श होते आणि त्यांच्यासोबत वेळ घालवणे म्हणजे स्वप्नपूर्तीच होती,असे डिव्हिलियर्सने सांगितले.

त्याने पुढे खुलासा केला की, मॅकग्रा... मी त्याच्याविरुद्ध २००६ मध्ये पहिल्यांदा कसोटी खेळलो होतो. त्यावेळी मी अक्षरशः दडपून गेलो होतो. त्याच्याशी मी एक शब्दही बोललो नव्हतो. पण २००८ मध्ये तो माझ्या शेजारी बसला आणि म्हणाला मला तुझी खेळण्याची शैली आवडते'. मी हादरलो. वाटलं, हे खरंच घडतंय का ?

डिव्हिलियर्सने दिल्ली डेअरडेव्हिल्सकडून तीन मोसम खेळले होते. त्यानंतर २०११ मध्ये तो रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडे गेला आणि तिथे त्याच्या कारकिर्दीने खऱ्या अर्थाने उंच भरारी घेतली. त्याने विराट कोहलीसोबतची भागीदारी, विस्मयजनक फटकेबाजी आणि स्थिरतेमुळे आयपीएलच्या इतिहासात आपले अढळ स्थान निर्माण केले.

डिव्हिलियर्सचा हा भावनिक आणि स्पष्टवक्तेपणाचा खुलासा, आयपीएलमधील संघराजकारणाच्या आणि ड्रेसिंग रूममधील वातावरणाच्या अनेक अपरिचित पैलूंना उजाळा देणारा ठरला आहे .






RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २८६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 286 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .